पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - १८. नगरसचिव कार्यालय
क्रमांक : नस/४/कावि/८११/२०१५
दिनांक : ०४/१२/२०१५

प्रति,

मा.....................................
सदस्य, महिला व बालकल्याण समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

विषय – पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.महिला व बालकल्याण समितीची पाक्षिक सभा दिनांक **०९/१२/२०१५** रोजी आयोजित केलेबाबत...

महोदय / महोदया,

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा. महिला व बालकल्याण समितीची पाक्षिक सभा बुधवार दिनांक **०९/१२/२०१५** रोजी दुपारी **३.००** वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली आहे. सोबत सभेची कार्यपत्रिका जोडली आहे. सभेस आपण उपस्थित रहावे, ही विनंती.

मा.कळावे,

आपला विश्वासू,



**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

प्रत – १) सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी
२) कार्यालयीन नोटीस बोर्ड

पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी ४११ ०१८.

**मा.महिला व बालकल्याण समिती सभा**

कार्यपत्रिका क्रमांक – ६

दिनांक – **०९/१२/२०१५** वेळ – दुपारी **३.००** वा.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.महिला व बालकल्याण समितीची पाक्षिक सभा बुधवार दिनांक **०९/१२/२०१५** रोजी दुपारी **३.००** वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली आहे. सभेत खालील कामकाज होईल.

----------

दिनांक १६/११/२०१५ व २६/११/२०१५ रोजी झालेल्या सभेचा **( कार्यपत्रिका क्रमांक ५ )** सभावृत्तांत कायम करणे.

----------

विषय क्र.१) नागरवस्ती विकास योजना विभागाकडील महिला व बालकल्याण योजने अंतर्गत विविध योजना राबविल्या जातात. मा.महापालिका सभा ठराव क्रमांक ४५७ दिनांक २०/०१/२०१४ अन्वये मंजूर धोरणनुसार घटक योजना क्र.१७ विधवा व घटस्फोटीत महिलांना अर्थसहाय्य देणे ही योजना राबविणेत येते. या योजने करिता सन २०१४-१५ या आर्थिक वर्षासाठी जाहिर प्रकटना नुसार अर्ज मागविणेत आले असता एकूण ११०० अर्ज प्राप्त झाले आहेत. सदर अर्जांची अटीशर्ती नुसार तपासणी केली असता एकूण ४५९ अर्ज पात्र ठरले आहेत. १५० अर्ज दुबार आहेत, ४९१ अर्ज अपात्र आहेत. सदर पात्र लाभार्थींना प्रत्येकी रक्कम रुपये ६,०००/- या प्रमाणे एकूण अंदाजे ४५९ पात्र होणा-या लाभार्थींसाठी रक्कम रुपये २७,५४,०००/- ( अक्षरी र.रु.सत्तावीस लाख चौप्पन्न हजार फक्त ) इतका खर्च अपेक्षित आहे. सन २०१५-१६ या वित्तीय वर्षात " विधवा व घटस्फोटीत महिलांना अर्थ सहाय्य " या उपलेखाशिर्षावर रक्कम रुपये २,००,००,०००/-( अक्षरी र.रु.दोन कोटी फक्त ) इतकी तरतूद शिल्लक आहे त्यामधून सदरचा खर्च करणेत येईल. पात्र ठरणा-या लाभार्थींना आर्थिक मदत देणेकामी येणा-या खर्चास र.रु.२७,५४,०००/- ( अक्षरी र.रु.सत्तावीस लाख चौप्पन्न हजार फक्त ) तसेच ही योजना १२ ही महिने खुली असल्याने सन २०१५-१६ अखेर पर्यंत जेवढे अर्ज प्राप्त होतील त्यातील पात्र लाभार्थींना अनुदान मंजूर करण्यास व

त्याकामी येणा-या खर्चास मान्यता देणेकामी मा.स्थायी समिती सभेकडे शिफारस करणेबाबत विचार करणे.

---------



**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी – ४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी – १८. नगरसचिव विभाग
क्रमांक : नस/४/कावि/८११/२०१५
दिनांक : ०४/१२/२०१५

टिप - प्रस्तुत कार्यपत्रिकेवरील विषयाचे विषयपत्र (डॉकेट्) नगरसचिव कार्यालयात वाचणेसाठी ठेवणेत आले आहे.